
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# अण्णाभाऊ साठे यांच्या कथेतील आंबेडकरी दर्शन

**प्रा. डॉ. शशिकांत खिलारे**
**श्रीमती चंपाबेन बालचंद शाह महिला महाविद्यालय, सांगली.**

**सारांश :-**




मराठी साहित्यात स्वातंत्र्योत्तर कालखंडात लेखन करणाऱ्या लेखकांमध्ये अण्णाभाऊ साठे हे एक श्रेष्ठ दर्जाचे आणि महत्त्वाचे साहित्यिक म्हणून रसिक, वाचकांना परिचित आहेत. स्वातंत्र्योत्तर कालखंडात लेखन करणाऱ्या साहित्यिकांनी समाजातील तळागाळातील लोकांचे अनुभवविश्व साहित्यात मांडून मराठी साहित्य समृध्द केले होते. जो समाज साहित्याच्या मुख्य धारेपासून दूर होता त्याला साहित्याच्या प्रवाहात आणण्याचे काम अण्णाभाऊ साठे यांनी केले आहे. त्यांच्या साहित्यात दलित, शोषित, वंचित, ग्रामीण, आदिवासी समाजाचे वास्तव चित्रण येते. त्यांनी कथा, कादंबरी, नाटक, लोकनाट्ये, लावण्या, पोवाडे, प्रवासवर्णन असे विपुल आणि सकस लेखन केले आहे. प्रारंभीच्या काळात त्यांच्यावर साम्यवादाचा प्रभाव होता. त्यामधून त्यांनी मार्क्सवादी प्रेरणेतून लेखन केले असले तरी पुढील काळात अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात आंबेडकरी विचारांची उर्जा पाहण्यास मिळते. त्यांच्या कथा लेखनात समाजातील विविध जातीधर्माची नागर, ग्रामीण आणि आदिवासी समाजाचे चित्रण येते. याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ मध्ये आपल्या लाखो अनुयायासहित बौध्द धम्मात धर्मांतर केले. या धर्मांतरासच 'धम्मचक्रप्रवर्तन' असे म्हणतात. यालाच धम्मक्रांती असे ही म्हटले जाते. या धम्मक्रांतीने पूर्वास्पृश्य समाजातील लोकांना आत्मभान प्राप्त करून दिले. त्यांना मानवतेची देणगी दिली. त्यामुळे अण्णाभाऊ साठे यांच्या सारख्या तत्वनिष्ठ, संवेदनशील लेखकावर धम्मक्रांतीचा प्रभाव पडला. आणि तो प्रभाव त्यांच्या साहित्यातून आविष्कृत झाला आहे. याचा अभ्यास प्रस्तुत 'अण्णाभाऊ साठे यांच्या कथेतील आंबेडकरी दर्शन' या शोधनिबंधात करावयाचा आहे.

**प्रास्ताविक :-**

अण्णाभाऊ साठे यांचे व्यक्तिमत्व चतुरस्त्र स्वरूपाचे होते. लेखक, नाटककार, कवी, लावणीकार अभिनेता, लोकशाहीर अशा विविध भूमिका त्यांनी लीलया पार पाडल्या आहेत. एक लेखक म्हणून त्यांची कारकिर्द १९४३ सालापासून सुरू झालेली आहे. त्यांची पहिली कथा १९४९ मध्ये प्रसिध्द झाली होती. तर त्यांचा पहिला खुळंवाडी हा कथासंग्रह १९५७ साली प्रसिध्द झाला. त्यानंतर त्यांचे कथालेखन १९६९ पर्यंत अव्याहतपणे चालूच होते. म्हणजेच त्यांनी वीस वर्षे कथालेखन केले आहे. त्यांचे आजपर्यंत १४ कथासंग्रह प्रसिध्द आहेत. आणि त्यांच्या एकूण कथांची संख्या जवळपास २५० च्या पेक्षा अधिक आहे. कथा या वाङ्मय प्रकाराशिवाय त्यांनी कादंबरी, नाटक, लोकनाट्ये, लावण्या, पदे, छक्कड, पोवाडे, प्रवासवर्णन असे विविध आणि विपुल लेखन केलेले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात केवळ त्यांच्या कथांचा अभ्यास आंबेडकरी विचारांच्या संदर्भात करावयाचा आहे. हा अभ्याससुध्दा निवडक प्रतिनिधिक कथांच्या स्वरूपात करायचा आहे. या अभ्यासात अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याच्या प्रेरणा वैचारिक बांधिलकी, साहित्याबद्दलची स्वतःची भूमिका, त्यांच्या साहित्यातील आंबेडकरी दर्शन यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**अण्णाभाऊ साठे यांचे व्यक्तित्व आणि वाङ्मय :-**

अण्णाभाऊ साठे यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाटेगाव या गावात १ ऑगस्ट १९२० रोजी झाला. त्यांच्या घरात औपचारिक शिक्षणाची परंपरा नव्हती कारण ते अस्पृश्य असलेल्या मांग समाजातील होते. ब्रिटीशांच्या काळात मांगांना गुन्हेगार ठरविले होते. त्यामुळे त्यांना शिक्षणाची परंपरा नव्हती. तरीही त्यांना शाळेत घातले परंतु अस्पृश्यत्वामुळे, जातीयतेमुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. ते शाळेत केवळ दीड दिवस गेले. परंतु प्रतिभावान असणाऱ्या अण्णाभाऊंनी शाळेत न जाताही साहित्य क्षेत्रात अलौकिक कामगिरी केली. प्रारंभीच्या काळात ते

अशिक्षित असल्यामुळे त्यांना पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी आई वडिलासमवेत मुंबईला जावे लागले. तेथे त्यांनी हमाल, घरगडी, बूटपॉलिशवाला, हॉटेलमधील कामगार, कुत्र्यांना सांभाळणारा, मुलांना सांभाळणारा अशी अनेक छोटी मोठी कामे केली. याचा काळात त्यांचा कामगार चळवळीशी संबंध आला. आणि ते कामगार चळवळीत सामील झाले. अण्णाभाऊंना उपजतच शाहिरीची ओढ होती. ती त्यांच्या घराण्याची परंपरा होती. त्यातूनच त्यांनी 'स्टॅलिनग्राडचा पोवाडा' लिहून क्रांतिकारी कार्य केले आणि पुढे त्यांनी साहित्याच्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली.

अण्णाभाऊ साठे यांनी साहित्याच्या क्षेत्रात कथा, कादंबरी, नाटक, लोकनाट्ये, प्रवासवर्णन, लावण्या, पोवाडे, पदे, छक्कड अशा विविध प्रकारच्या साहित्याची निर्मिती केलेली आहे. अण्णाभाऊ साठेंचे कथालेखन १९४९ ते १९६९ पर्यंत म्हणजे सुमारे वीस वर्षे केले. त्यामध्ये त्यांनी सुमारे २५० कथांचे लेखन केले आहे. या वीस वर्षामध्ये त्यांनी खुळंवाडी, बरबाद्या कंजारी, गजाआड, चिरागनगरची भुते, निखारा, नवती, आबी, गुऱ्हाळ, लाडी, फरारी, कृष्णाकाठच्या कथा, भानामती, पिसाळलेला माणूस, अमृत असे एकूण १४ कथासंग्रह लिहिले आहेत या कथासंग्रहातील निवडक कथांच्या आधारे त्यांच्या कथा साहित्यातील आंबेडकरी दर्शन घडविणार आहे.

## अण्णाभाऊंची साहित्य विश्व :-

अण्णाभाऊंच्या साहित्य परंपरेचा विचार करताना त्यांचे साहित्य हे लालित्य आणि वैचारिक प्रबोधनाने ठासून भरलेले आहे. परंतु आपल्या साहित्य दृष्टीबद्दल खुद्द अण्णाभाऊ साठे म्हणतात की, "मी जे जीवन जगलो, जगत आहे, नि जे मी अनुभवलं आहे तेच मी लिहितो वास्तवतेला फाजील महत्व देणारा म्हणून काही मित्र माझ्यावर रागवतात पण मी त्यांचा राग मनावत घेत नाही नि आपला खाक्या बदलत नाही. वास्तवता नि कल्पकता यांचा कसा मेळ घालावा हा एकच प्रश्न माझ्यापुढे उभा असतो. माझी माणसं मला कुठं ना कुठं भेटलेली असतात. त्यांचं जगणं, मरणं मला ठाऊक असतं. मग मी कल्पनेत त्याचे पदर जुळवतो एवढंच"[1] या विचारावरून अण्णाभाऊ साठे हे वास्तवता स्वीकारणारे लेखक आहेत. ते कल्पनेच्या भराऱ्या मारण्यापेक्षा अस्सल जीवनानुभव साहित्याच्या माध्यमातून मांडणारे आहेत म्हणूनच त्यांच्या लेखनात भेटणारी माणसे ही ग्रामीण भागातील रांगडी, इरसाल, साधी भोळी, नैतिकतेने वागणारी, अब्रुदार आहेत. त्याचबरोबर गावकुसाच्या बाहेर राहणारी अठरापगड जातीची आहेत. यामध्ये मांग, महार, चांभार, तेली, न्हावी, वाणी याबरोबरच भटक्या जातीतील फासेपारधी, कंजारी, माकडवाले, वैदू, डोंबारी, बाळगोपाळ इत्यादी आहेत. याबरोबरच मुंबईतील झोपडपट्टी राहणारी, पोटांची आग विझविण्यासाठी प्रयत्न करणारे चोर, दरोडेखोर, खुनी, पाकिटमार, भामटे, गुंड, मवाली आहेत. याबरोबरच सवर्ण समाजातील पाटील, गुंड, ब्राह्मण आणि तत्सम जातीची माणसे आहेत. या सर्व माणसामध्ये नैतिकतेने वागणारी, मानवतावादी दृष्टिकोन ठेवणारी जशी आहेत. त्याप्रमाणे पोटासाठी चोऱ्या करणारी, फसविणारी आहेत. अशा विविध प्रकारच्या माणसांची फौजच त्यांच्या साहित्यात पाहण्यास मिळते. समाजात दबलेली, शोषित असणारी, अठरा विश्वे दारिद्र्यात खितपत पडलेल्या माणसांचे जग त्यांनी जवळून अनुभवलेले होते. त्यांचा संघर्ष हा भुकेसाठी चाललेला होता. या संदर्भात प्राचार्य जनार्दन वाघमारे म्हणतात की, 'भूक हा खरे म्हणजे अण्णाभाऊंच्या साहित्याचा विषय आहे. आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी अण्णा भाऊंच्या साहित्यातील सर्व माणसं सतत आक्रोश करीत असतात, आक्रोश करीत असतात. लढत असतात. मराठी साहित्याला सामाजिक संघर्षाच्या तत्वज्ञानाची फारशी ओळख नव्हती. ही खऱ्या अर्थाने अण्णाभाऊंनी करून दिली. जे लोक सनातनी लोकांच्या पायाखाली दबले आहेत. चिरडले आहेत आणि चरफडत आहेत अशांची बाजू अण्णाभाऊंनी घेतली आणि या सनातनी संस्कृतीच्या वैभवाला पेल्याच्या नक्षीदार खांबावर अण्णाभाऊंनी आपल्या लेखणीचे घाव घातले. विषमतेला जन्म देणाऱ्या व्यवस्थेच्या विरूध्द अण्णा भाऊंनी आयुष्यभर लढा दिला. समाजातल्या, अन्यायग्रस्त, पीडित, दलित आणि गांजलेल्या माणसांसाठी त्यांनी आपल्या लेखणीची कुऱ्हाड केली आणि मराठी सारस्वतांच्या चौसोपी वाड्यात हातात रक्ताने माखलेली कुऱ्हाड घेऊन त्यांनी प्रवेश केला."[2] अशा या उपेक्षित माणसांना पहिल्यांदाच मराठी साहित्यात उभा करण्याचे श्रेय अण्णाभाऊ साठे यांना जाते. अण्णाभाऊंच्या साहित्याबद्दल चर्चा करताना वि. स. खांडेकर 'फकिरा' या पुस्तकाच्या प्रस्तावने मध्ये म्हणतात की, 'त्यांचा (अण्णाभाऊ साठे यांचा) प्रकृतिधर्म आहे गंभीर लेखकाचा ! त्यानं फार भोगलं आहे. सात पडद्यातून नव्हे तर समोरासमोर जीवनातल्या क्रूर सत्याचं ज्याला दर्शन घडलं आहे. अशा पोटतिडकीन लिहिणाऱ्या साहित्यिकाचा आत्मा त्याच्यापाशी आहे. त्यांच्या गोष्टी मोठ्या वैशिष्ट्यपूर्ण असतात."[3] या चर्चेमधून वि. स. खांडेकरांनी अण्णाभाऊंचा साहित्यिक पिंड कसा घडला आहे. आणि त्यांची साहित्य प्रेरणा आणि स्वभाव काय आहे याचे विवेचन त्यांनी केले आहे.

## अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य प्रेरणा :-

अण्णाभाऊ साठे हे वास्तववादी दृष्टीने लेखन करणारे लेखक होते. त्याचबरोबर ते साहित्याच्या माध्यमातून प्रबोधन घडविणारे लेखक होते. म्हणून त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमांतून सर्वसामान्य माणसांना केंद्रबिंदू मानले आहे. त्यांच्या एकूणच सर्व कलाकृतीतील माणसे पाहिली तर ती सर्वसामान्य आहे. अशा सर्वसामान्यांसाठी कार्य करणाऱ्या कार्ल मार्क्स, मॅक्झिम गॉर्की, जोतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पासून प्रेरणा घेऊन अण्णाभाऊ साठे यांनी लेखन केले आहे. अण्णाभाऊंच्या साहित्यिक प्रेरणेविषयी डॉ. मच्छिंद्र सकटे

म्हणतात की, "अण्णाभाऊ साठे हे मार्क्सवादी असूनही ते आंबेडकरवादी होते हे एक वास्तव आहे. मार्क्सला अभिप्रेत असणारी वर्गमुक्ती आणि बाबासाहेबांना अभिप्रेत असणारी वर्णमुक्ती या दोन्ही विचारांचा मिलाफ अण्णाभाऊंच्या साहित्यात स्पष्टपणे दिसतो."[4] प्रा. सकटे अण्णाभाऊंच्या प्रेरणेविषयी पुढे म्हणतात की, "......अण्णाभाऊ मांग होते, आंबेडकरवादी होते तरी ही ते मार्क्सवादी होते आणि बौध्द विचारांचे ही दर्शन त्यांच्या साहित्यातून घडत होते. काही कर्मठ आंबेडकरवादी अण्णाभाऊंना मार्क्सवादी म्हणून दूर लोटतात. आणि ते आंबेडकरवादी लेखक नव्हते असे ते समजतात. परंतु अण्णाभाऊ हे आंबेडकरवादी होते हे सिध्द करणे फारसे अवघड नाही. कारण भारतातील दलितांच्या दु:खाचे आणि शोषणाचे मूळ असलेली जातिव्यवस्था नष्ट करणे हे बाबासाहेबांचे महान ध्येय होते आणि अण्णाभाऊंच्या झुंजार लेखणीने बाबासाहेबांच्या या ध्येयाशी व स्वप्नाशी जीवनभर इमान राखल्याचे दिसते. म्हणून तर बाबासाहेबांच्या झुंजार लेखणीची ओळख अण्णाभाऊंना पटली. अण्णा भाऊंच्या अनेक साहित्यकृतीत आंबेडकरवाद स्पष्टपणे दिसतो."[5] उपरोक्त विचारानुसार पाहिल्यास अण्णाभाऊंच्या व्यक्तिमत्वावर प्रारंभी कार्ल मार्क्स आणि नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. त्यामुळेच अण्णाभाऊंचा साहित्यिक पिंड मार्क्स आणि आंबेडकरांच्या विचारांनी पोसलेला आहे आणि त्याचेच प्रतिबिंब अण्णाभाऊंच्या साहित्यात पाहण्यास मिळते.

### अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरी दर्शन :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आंबेडकरी चळवळ ही १९२० पासून सुरू झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पूर्वास्पृश्य समाजातील लोकांना माणुसकीचे हक्क मिळावेत म्हणून विविध लढे दिले, चळवळी केल्या. १९५६ ला त्यांनी हिंदू धर्माचा त्याग करून बौध्द धम्मात धर्मांतर केले ही एक क्रांती होती. या क्रांतीने अनेकजन प्रेरीत झाले होते अण्णाभाऊ साठे हे याच काळात लेखन करणारे लेखक होते. त्यांच्यावरही धम्मक्रांतीचा प्रभाव पडला आणि त्यांनी आपल्या कथा, कादंबरीत आणि एकूणच साहित्यात आंबेडकरी जीवनमूल्ये रूजविण्याचा प्रयत्न केला आहे. फकिरा या आपल्या कादंबरीची अपर्णपत्रिका लिहिताना अण्णाभाऊ साठे म्हणतात की, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीस' या विचारांमधून अण्णाभाऊंच्या वैचारिकतेचा प्रभाव लक्षात येतो. याचबरोबर अण्णाभाऊंनी जी विविध पदे लिहिली आहेत. त्यामध्ये 'जग बदल घालुनि घाव !' या नावाच्या पदामध्ये ते लिहितात की, 'जग बदल घालुनि घाव। सांगून गेले मला भीमराव'[6] या पद्यातील भीमराव म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. त्यांनी ज्याप्रमाणे विविध लढे उभारून वंचित, उपेक्षित दलित माणसांना संघर्ष करून माणुसकीचे हक्क प्राप्त करून दिले त्याचप्रमाणे आपणही जग बदलण्यासाठी घाव घातले पाहिजेत असा आशावाद अण्णाभाऊंनी व्यक्त केलेला आहे. हा आशावाद व्यक्त करताना बाबासाहेबांची आपणास संघर्ष करून न्याय हक्क मिळवले पाहिजेत असे सांगितले आहे. असे त्यांना वाटते.

आंबेडकरी विचारामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वत्रयी बरोबरच बौध्द धम्मातील नैतिकता, सदाचार या गोष्टाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. अण्णाभाऊंच्या साहित्यात नैतिकतेला महत्व आहे. त्यांच्या साहित्यात देशाचे स्वातंत्र्य, स्त्रीचे शील, पुरूषाचा स्वाभिमान आणि मानवाची प्रतिष्ठा याला अतिशय महत्व आहे. त्यामुळेच नैतिक मूल्यांची जोपासणा करण्याचे काम अण्णाभाऊंची पात्रे करताना दिसतात. तेथे त्यांचा कोठेही तोल ढळत नाही. उदा. डोळे ही कथा या कथेतील गीता तरूण, सुंदर आहे. तिचे सौंदर्य डोळ्यात आहे. तिच्या सुंदर डोळ्यामुळे तिच्यावर संकट आलेले आहे. तिचा चुलत दीर सतत तिचे डोळे पाहत असतो. त्याला ते आवडतात. पण गीताच्या पतीला ही गोष्ट आवडत नाही. म्हणून तो तिला बेदम मारहाण करतो तू शुध्द आहेस हे सिध्द करण्यासाठी तो तिला विशाळगडावर घेऊन जातो. उकळत्या तेलातील पैसा काढण्याचे आव्हान तिला दिले जाते. तिला ते मान्य होत नाही कारण ती एक अंधश्रध्दा आहे आणि ती स्वत: शुध्द पवित्र आहे. अशा परिस्थितीत ती आपल्या माहेरी निघते. पन्हाळगडाजवळच तिला सायंकाळ होते तेव्हा तिला तेथे एक वाटसरू भेटतो त्याच्याबरोबर ती सागावला जाण्याचा बेत करते. आणि आपली कर्म कहाणी त्याला सांगते. त्या वाटसरू बरोबर ती अनेक संकटांना तोंड देत सुखरूप आपल्या माहेरी पोहचते. त्याबद्दल त्या वाटसरूचे आभार मानते. काही दिवसांनी तो वाटसरू तिच्या घरी गेला त्यावेळी तिने आपले सुंदर डोळे शेंडाच्या चिकाने फोडलेले असतात. यासंबंधी ती म्हणते की, "माझ्या डोळ्यांनी माझं नांदणं उठवलं इज्जत गेली, बापाच्या नावाला कलंक लावला."[7] म्हणून तिने डोळे फोडून घेतले. परंतु 'डोळे' या कथेतील गीता चारित्र्यवान होती. नैतिकेने वागणारी होती. अण्णाभाऊंच्या साहित्यात नैतिकतेला सर्वश्रेष्ठ स्थान दिले आहे. याच प्रकारची 'प्रायश्चित' या नावाची एक कथा आहे. या कथेत उमा, बळी, सुभद्रा आणि लीला अशी पात्रे आहेत. सुभद्रा ही बळीची बहिण आहे तर लीला ही उमाची बहिण आहे. बळी आणि लीलाचे व उमा आणि सुभद्राचे एकाच मांडवात एकाच तिथीला लग्न होऊन मुंबईतील एका दगडाच्या खणीत ते दगड फोडण्याचे काम करीत असतात. आणि आपला सुखाचा संसार करत असतात. परंतु एके दिवशी उमा आणि बळीने थोडीशी दारू घेतली आणि उशीरा ते घरी आले यावेळी एकाच झोपड्यात दोन चुली आणि दोन संसार सुरू असतात. यावेळी उमा आणि बळी दारूमुळे वेगवेगळ्या अंथरूणात गेले. सकाळी सुभद्रा आणि लीलाने त्यांना पाहताच आपल्या अंथरूणात आपला भाऊ आहे असे पाहताच त्या दोघींनी जवळच्या तळ्यात जीव दिला तर उमा आणि बळीने ही तोच मार्ग पत्करून जीवन संपविले. या

कथेत नात्यांची पायमल्ली झाली म्हणून प्रायश्चित घेताना या चौघांनी आपला जीव दिला. या कथेमधून अण्णाभाऊंची माणसे नैतिकतेला महत्व देणारी आहेत असे दिसते. अण्णाभाऊंच्या अनेक साहित्यकृती मध्ये नैतिकतेला सर्वश्रेष्ठ महत्व आहे हेच यातून दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अंध:श्रध्देला नकार दिला होता. कारण बाबासाहेब हे विज्ञाननिष्ठ विचारांचे पाईक होते. याच विचारांचा आविष्कार अण्णाभाऊ साठे यांच्यावर झालेला आपणास पाहण्यास मिळतो. अण्णाभाऊ साठे यांनी अंध:श्रध्देला नाकारून विज्ञानिष्ठ विचारांची कास धरलेली आहे. उदा. 'डोळे' या कथेतील गीताला विशाळगडावर नेऊन तू जर पवित्र असशील तर उकळत्या तेलातील पैसा काढशील असे सांगितले. त्यावेळी ही एक अंध:श्रध्दा आहे याची तिला जाणीव झाली. त्यावेळी त्या माणसाला ती म्हणते की, "मी पापी आहे असं म्हणून तो पैसा काढा जर तुमचा हात जळला नाही तर मी पापी" असं म्हणून तो पैसा काढण्यास ती नकार देते. हा नकार देण्याचे सामर्थ्य तिला आंबेडकरी चळवळीमुळेच प्राप्त झाले आहे असे वाटते. 'मरीआईचा गाडा' या कथेत अण्णाभाऊ साठे यांनी माणसांच्या मनातील अंध:श्रध्देचे भूत गाडून टाकण्याचे काम केले आहे. या कथेत सटवाजी, केरू नलवडे, बाबाजी आणि म्हादबा आणि नाना अशी महत्वाची पात्रे आहेत. नाना वगळता सर्वजन अंध:श्रध्देच्या आहारी गेले आहेत. गावात आलेल्या प्लेगाच्या साथीने सर्व गावकऱ्यात भीतीचे वातावरण निर्माण झालेले असते. यातून मार्ग काढण्साठी गावातील ज्येष्ठ मंडळी मरीआईचा गाडा गावाबाहेर सोडायचा निर्णय घेतात परंतु मरीआईचा गाडा कोणत्या दिशेला सोडायचा यावर बराच खल होतो. परंतु निर्णय काही लागत नाही. जुन्या विचारांच्या माणसांच्या मते गावात तीन शुक्रवार चाक बंद ठेवण्याचा निर्णय होतो. परंतु गाडीचे चाक, मोटेचे चाक बंद ठेवता येईल पण गावाच्या हद्दीतून जाणारे रेल्वेचे चाक आपण बंद ठेवू शकत नाही. याची जाणीव नव्या विचाराचा नाना सर्वांना करून देते आणि प्लेगाची साथ का आली याची कारण मीमांसा करून त्यास अस्वच्छता कारणीभूत आहे म्हणून स्वच्छतेचे महत्व नाना सर्वांना पटवून देतात. या कथेत अंध:श्रध्दा नाकारून विज्ञानवादी विचाराचा स्वीकार करण्याचे बळ या कथेत मिळते. आंबेडकरी विचारात अंध:श्रध्देला नकार दिलेली आहे. याचेच वर्णन या कथेत आलेले आहे.

आंबेडकरी विचाराने पारंपरिक कामांना नकार दिलेला आहे. याचा प्रत्यय अण्णाभाऊ साठे यांच्या 'सापळा' या कथेत आला आहे. या कथेत दादा देशमुखाचा बैल दावणीला मरून पडलेला असतो. पारंपरिक विचारानुसार दलितांनी सवर्णांची मेलेली गुरे ओढून नेणे हे काम त्यांचे असते. यानुसार नाना देशमुख महारांना बैल ओढून नेण्यास सांगतो. परंतु आंबेडकरी विचारांची उर्जा मिळालेले महार लोक अशा हलक्या कामांना नकार देतात. याचा राग सवर्ण असणाऱ्या देशमुखांना येते. त्यामुळे ते दलितांच्यावर बहिष्कार टाकतात. त्यांचे काम बंद करतात, त्यांना रानात येऊ दिले जात नाही. दुकान बंद, पाणी बंद जनावरांना चारा बंद अशा प्रकारे गाववाल्यांनी दलितांना सापळ्यात अडकविलेले असते. परंतु हरिबा महार हा सापळा तोडतो. त्याने पारगावच्या पळसाच्या पानाचा लिलाव घेतला आणि गावकऱ्यांना शह दिला त्यामुळे दलितांच्या गुरा-ढोरांना चरायला माळ मिळाला परंतु सवर्णाच्या जनावरांना माळावर जागा मिळेना त्यामुळे त्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला. शेवटी गावकरी आणि दलित एकत्र येऊन माणसावाणी जगू या असे म्हणतात. या कथेत आंबेडकरी विचारांचा आणि दलितांच्या ऐक्याचा विचार झाला असे दाखविले आहे.

'उपकाराची फेड' या कथेत दलित आणि दलित असा संघर्ष, मांडलेला आहे. या कथेत शंकर चांभार आणि मळू महार यांच्यातील दलितांतर्गत असणारा श्रेष्ठ-कनिष्ठ वाद या कथेचे मध्यवर्ती सूत्र आहे. सनातनी विचारानुसार प्रत्येक जात आपण इतरापेक्षा श्रेष्ठ आहेत हा वृथा अभिमान बाळगत असते. या कथेतील शंकर चांभार मांगा-महाराच्या खेटराला हात लावत नाही. तो जातीयता पाळत असतो फुटक्या कपातून तो लखू मांगाला चहा देतो तर अंगठा तुटलेले चप्पल दुरूस्त करण्याऐवजी मळू महाराकडे परळातील सळ आणि आरी देतो मळू महार त्याने आपल्या चप्पलचा आंगठा दुरूस्त करतो. शंकर चांभार आणि मळू महाराच्या मध्ये जातीतेच्या वरून शाब्दिक चकमक होते. शंकर मळूला म्हणतो की, 'तुम्ही आमची बरोबरी करू नका ...... तुम्ही ढोरं ओढता कातडी काढता...'[9] तर मळू म्हणतो आम्ही काढलेली कातडी चिलबिलूनच तू संसार करतोस नी वर बेंबीला थुका लावून ब्राह्मण बनतोस. या विधानावर शंकर अनुत्तरीत होतो. एकदा शंकर चांभाराची म्हैस मरते त्यावेळी शंकऱ्या मळूला आपली म्हैस ओढण्याविषयी सांगतो त्यावेळी मळू महार आपली आरूसं आणि कावडणी शंकऱ्या पुढे टाकतो आणि म्हैस ओढायला नकार देतो. भारतीय समाजात जातिश्रेष्ठत्वामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातनिर्मूलनाचे कार्य हाती घेतले होते. या कथेतील मळू जातीचा अहंकार बाळगत नाही. तर शंकर जातीचा अभिमान बाळगतो पण त्याचा अहंकार गळून पडतो हे या कथेतून प्रकट होते त्यामुळे आंबेडकरी विचारांची उर्जा याही कथेतून पाहण्यास मिळते.

### निष्कर्ष :-

अण्णाभाऊ साठे हे एक पुरोगामी विचाराचे लेखक होते. त्यांनी साहित्यातील विविध वाङ्मय प्रकार हाताळले आहेत. प्रारंभी त्यांच्या साहित्यावर मार्क्सवादी विचारांचा प्रभाव होता. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १९५६ च्या धम्मक्रांतीचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर प्रभाव पडला आणि ते आंबेडकरी जाणिवांचे साहित्यिक बनले अण्णाभाऊ साठे यांच्या कथेत आंबेडकरी विचारातील नैतिकता अंध:श्रध्देला नकार, दलितांच्या हलक्या कामांना नकार देणे. जातीचे निर्मूलन करणे अशा विविध आंबेडकरी जाणिवांचा जागर अण्णाभाऊ साठे यांच्या कथा लेखनात आहे म्हणूनच ते आंबेडकरी लेखक आहेत.

## संदर्भ टिपा

१) अण्णाभाऊ साठे : आवडी, प्रस्तावना, शेट्ये प्रकाशन कोल्हापूर पृ. ३.
२) मच्छिंद्र सकटे : अण्णाभाऊ साठे एक सत्यशोधक, प्रज्ञा प्रकाशन कोल्हापूर पृ. ४५.
३) वि. स. खांडेकर : फकिरा प्रस्तावना, सुरेश एजन्सी, पुणे, पृ. २.
४) मच्छिंद्र सकटे : उनि पृ. ३६.
५) तत्रैव
६) अण्णाभाऊ साठे : 'शाहिरी' पृ. १०.
७) अण्णाभाऊ साठे : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाङ्मय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
८) तत्रैव पृ. ४५०.
९) तत्रैव पृ. ४४४.